Government Of India

**महाराष्ट्र शासन**

**महसुल व वन विभाग**

**तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER , तहसिल कार्यालय मुखेड**

दुरध्वनी क्र :- ०२४६१-२२२५२२ EMAIL ID :- tahmukhed1@gmail.com

वाचा :- १. भारतीय साथ रोग अधिनियम १८९७

२. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३०,३३,३४,४१ व ५१

३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्र.कोरोना २०२०/प्र.क्र.५८ आरोग्य दिनांक १३ मार्च २०२०

४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्र.५८ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

५. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नांदेड यांचेकडील आदेश क्र. २०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/को/सीआर दिनांक १७/०४/२०२०

६. वैद्यकीय अधिक्षक उप जिल्हा रुग्णालय मुखेड यांचे यांचे पत्र क्र. ३५०/ २०२० दि. २२/०५/२०२०

---

क्रमांक/संकार्ण/ कोरोना विषाणु/ कावी / रावणकोळा /२०२० दिनांक -२२ /०५/२०२०

<u>आदेश</u>

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोटकलम २(अ) नुसार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

त्याअर्थी, उपनिर्दिष्ट वाचले क्र.३ अन्वये कोरोना विषापुचा (कोव्हीड -१९) covid-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात सात रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३, व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणी साठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली उपनिर्दिष्ट वाचले क्र.४ अन्वये प्रसिध्द केली आहे व मा. जिल्हाधिकारी यांनी सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी, उपनिर्दिष्ट वाचले क्र.५ अन्वये तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER , तहसिल कार्यालय मुखेड यांची कोरोना विषाणूचा (कोव्हीड -१९) संसर्ग प्रादुर्भाव रोखण्यासाठी साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ याकायद्यातील तरतुदीचा अंमलबजावणीसाठी INCIDENT COMMANDER म्हणून मुखेड तालुक्यासाठी नियुक्ती केलेली आहे.

ज्याअर्थी, वैद्यकीय अधिक्षक उप जिल्हा रुग्णालय मुखेड यांचे अहवालानुसार **<u>मौजे रावणकोळा ता. मुखेड</u>** जिल्हा नांदेड नमूद तपशिल परिसरातील कोरोना संसर्ग संशयित रुग्ण, वैद्यकीय प्रयोगशाळा चाचणी अहवालानुसार कोराना विषाणू लागण सिध्द (Positive) झाल्याने शासनाच्या Containment Plan मार्गदर्शक सूचना नुसार तातडीने करावयाच्या उपाययोजना अनुषंगाने, मी, के.एच. पाटील तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER , तहसिल कार्यालय मुखेड खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. वरील नमुद पत्यावर राहणारा रूग्न कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) लागण सिध्द (Positive) झाल्याने सदरचे ठिकाण केंद्र बिंदु (Epicenter) घोषित करून त्याचे पासून 3 कि.मी. अंतरातील परिघाचे क्षेत्र हे Containment Area मध्ये घोषित करणेत येत आहे. तसेच त्यास लागून असलेले 5 किमी. परिघातील क्षेत्र हे बफर झोन म्हणून घोषित करणेत येत आहे.उपरोक्त क्षेत्राचा नकाशा सोबत जोडला आहे.

२. Containment Area मध्ये पुर्णपणे संचारबंदी लागू राहील आणि सदरचे क्षेत्राचे प्रवेश आणि निर्गमित करण्यास बंदी असेल. अत्यावश्यक सेवा जसे किरणा साहित्य व भाजीपाला, दवाखाना / मेडिकल यांची आवश्यकता असल्यास शासकीय यंत्रणेमार्फत वेगळया आदेश नुसार त्याचा पुरवठा मागणी प्रमाणे सशुल्क करण्यात येईल.

३.कंटेनमेंट क्षेत्रातील सर्व संबंधीत नागरीकांनी मास्कचा वापर करणे अनिवार्य राहिल.तसेच मास्क मानांकित प्रतिचे अथवा घरगुती पध्दतीने तयार केलेले व योग्य पध्दतीने स्वच्छ व निर्जंतुक करून पुन्हा वापरता येण्याजोगे असणे आवश्यक राहील.

Scanned with CamScanner

४. कंटेनमेट क्षेत्रात सर्व घरांचे सर्वेक्षण निर्धारित वेळेत पूर्ण करावे.

५. कंटेनमेट एरियासाठी योग्य त्या वैद्यकीय पथकाची नियुक्ती तालुका आरोग्य अधिकारी यांनी तात्काळ करावी.

६. सदर क्षेत्राच्या चेक पोस्ट एक्झिट पॉईटवर आरोग्य क्षेत्रातील पथकाव्दारे सातत्याने तपासणी ( Screening ) केली जाईल.

७. सर्व नियुक्त क्षेत्रीय आरोग्य कर्मचारी हे पन्नास पन्नास घरांना भेट देऊन अहवाल विहित नमुन्यात ISDP नोडल अधिकारी यांना सादर करतील.

८. सर्व पथके दररोज कोव्हीड – १९ च्या संशयास्पद केस च्या दैनंदिन परीक्षण करतील आणि ताप, खोकला, घसा खवखवणे आणि श्वास घेण्यात अडचण यासारख्या कोव्हीड -१९ संसर्गाच्या संभाव्य लक्षणांबद्दल शीघ्र प्रतिसाद पथक (आरआरटी ) यांना कळवावे.

९. कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) लागण सिध्द (Positive) रूग्नाचे संपर्कात आलेल्या सहवासित व्यक्तींचा तात्काळ शोध घेणे आणि वैद्यकीय पथकाचे निर्देशाप्रमाणे HOME / INSTITUTIONAL QUARANTINE ची आणि इतर वैद्यकीय कार्यवाही तातडीने करणे.

१०. HOME QUARANTINE ज्यांना केलेले आहे त्या व्यक्तीचा वेद्यकीय चाचणी अहवाल नकारात्क ( Negative) येईपर्यंत नियमित दैनंदिन भेट देवून पाठपुरावा करणेत यावा. व यासाठी आवश्यक कर्मचारी नियूक्त करणेत यावे. जर HOME QUARANTINE केलेल्या संशयित व्यक्तचा अहवाल सकारात्कम (Positive) आल्यास संबंधीत व्यक्तींच्या जवळच्या व्यक्तिना १४ दिवस HOME QUARANTINE करणेत यावे आणि पाठपुरवा 28 दिवस करावा.

११. Infection संक्रमणाचा पुढील प्रसार रोखण्यासाठी संशयित संक्रमित व्यक्तिशी संपर्क झालेल्या सर्व संबंधीत व्यक्तींना ( सेल्प डिक्लेरेशन फॉर्ममध्ये नमूद केलेले ) संपर्क साधून, होम कारोटिन करण्याची कारवाई करून आणि त्यांच्याशी दररोज संपर्क साधून ट्रॅकचा अहवाल सादर करणे.

१२. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेव्दारे उपरोक्त परिसराची संपुर्ण स्वच्छता करून अहवाल सादर करावा.

१३. मार्गदर्शक सुचनाप्रमाणे सदर गावाच्या ठिकाणी सबंधित विभाग प्रमुखानी तातडीने चेक पोस्ट स्थापित करण्यात यावी व त्यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

१४. सर्व संबंधित पथकातील नियुक्त सर्व अधिकारी/कर्मचारी य़ांनी कामकाज करताना वैयक्तिक सुरक्षा उपकरणे आणि शासनाच्या आरोग्य विभागाचे मार्गर्शक सूचनांचे पालन करावे.

( के.एच. पाटील )
तहसिलदार तथा
INCIDENT COMMANDER
मुखेड

**प्रतिलीपी ,**

१. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.जिल्हा पोलीस अधिक्षक, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.उपविभागीय अधिकारी देगलूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा.उपविभागीय पोलीस अधिकारी यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,मुखेड यांना योग्यत्या कार्यवाहीस्तव.
६. तालुका आरोग्य अधिकारी मुखेड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
७. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रूग्णालय मुखेड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
८. सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन मुक्रामाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
९. मंडळ अधिकारी मुक्रामाबाद, विस्तर अधिकारी(पंचायत) रावणकोळा योग्य त्या कार्यवाहीस्तव.
१०. तलाठी / ग्रामसेवक रावणकोळा योग्य त्या कार्यवाहीस्तव.
११. आदेशसंचिका.

( के.एच. पाटील )
तहसिलदार तथा
INCIDENT COMMANDER
मुखेड

Scanned with CamScanner